|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/६/प्र.पा/एम.एस्सी.प्र.प्रक्रि./२१ /२०२१ दिनांक :- ०२ मार्च, २०२१

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
पदव्युत्तर एम.एस्सी.अभ्यासक्रम राबविणारे सर्व महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य यांना

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील पदव्युत्तर एम.एस्सी. (सर्व विषय) आणि एम.ए./एम.एस्सी.(भूगोल) या अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियास मुदत वाढ देणे बाबत.

**महोदय,**

आपणास विदितच आहे की, आपल्या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील पदव्युत्तर एम.एस्सी.(सर्व विषय) आणि एम.ए./एम.एस्सी.(भूगोल) या प्रथम वर्ष अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन केंद्रीय राबविण्यात आली आहे. सदर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या सर्व फेऱ्या पुर्ण झालेल्या आहेत. मात्र काही विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी / पालकांनी व प्राचार्यांनी मा.कुलगुरु महोदय आणि मा.प्र-कुलगुरु महोकदयांकडे प्रवेश मिळण्यासाठी विनंती अर्ज / पत्र सादर केलेले आहे.

तेव्हा प्राप्त झालेल्या अर्जाचा व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हीताच्या दृष्टीने व कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भावामुळे प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता यावा या दृष्टीने, विद्यापीठाने मंजूर केलेल्या प्रवेश क्षमतेतील रिक्त असलेल्या जागा महाविद्यालय स्तरावर गुणवत्ते नुसार भरण्यास मा.कुलगुरु महोदयांनी परवानगी दिली आहे.

तेव्हा, प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने मान्यता दिलेल्या प्रवेश क्षमतेतील रिक्त असलेल्या जागा आपल्यास्तरावर गुणवत्तेनुसार (केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सामान्य गुणवत्ता यादीत नाव असणे आवश्यक) भरण्याची प्रवेश प्रक्रिया दिनांक ३ मार्च,२०२१ व ४ मार्च, २०२१ या रोजी करण्यात यावी. फक्त या दोन दिवसात प्रवेश प्रक्रियेची संपुर्ण कार्यवाही करण्यात यावी.

कृपया सदर बाब सर्व संबंधीत प्राध्यापक,अधिकारी,कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे

क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतरी पेटवू ज्ञानज्योत जळगाव-४२५००१

आपला विश्वासू,

कक्षाधिकारीकरिता
प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग

☎ :- (९१) ०२५७ - २२५७२९२, २२५७४०८, २२५७२९७, वेबसाईट :- www.nmu.ac.in, ई-मेल :- registrar@nmu.ac.in
फॅक्स क्रं:- (९१) ०२५७- २२५८४०३,४०६ प्रवेश पात्रता विभाग, पत्र पेटी क्रं. ८०, क.ब.चौधरी उमविनगर, जळगांव -४२५००१